व्यंकटेश महाविद्यालयातील बीकॉम आयटी विद्यार्थ्यांची अभ्यास भेट

"ACME Infovision pvt. Ltd. Satara येथे श्री वेंकटेश महाविद्यालयातील बीकॉम आय टी विभागामार्फत अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. बीकॉम आयटीच्या विद्यार्थ्यांना कंपनीतील कामकाज, व्यवस्थापन, विविध सॉफ्टवेअर, प्रक्रिया, सॉफ्टवेअर क्षेत्रातील कामकाज, कामकाजाचे स्वरूप प्रत्यक्ष रीत्या पाहता यावे, जे शिक्षण आपण घेतो त्या शिक्षणाचा प्रत्यक्ष वापर, कंपनीमध्ये चालणारे कामकाज कशाप्रकारे चालते याविषयी विद्यार्थ्यांना माहिती व्हावी हा उद्देश ठेवून सदर अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. एकूण ३१ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या कंपनीस भेट दिली व माहिती जाणून घेतली. अभ्यास भेटीचे नियोजन व आयोजन बीकॉम आय टी विभागाचे विभाग प्रमुख श्री. एस. एम. वंजीरे, उपविभाग प्रमुख श्री. एम. डी. जाखले आणि प्राध्यापिका सौ. के. वी. उपासे यांनी केले होते. सदर अभ्यास भेटीमुळे आम्हास खूप फायदा झाला जे ज्ञान लॅब मध्ये आम्हाला मिळते त्याचा प्रत्यक्ष कंपनीमध्ये कशाप्रकारे उपयोग केला जातो याविषयी प्रत्यक्ष कंपनीमध्ये भेट देऊन आम्हाला ते अनुभवता आले अशा प्रकारची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी अभ्यास भेटीमध्ये दिली.

